RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ४४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XXXII OF 2025.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :— सन १९६२ चा महा. अधिनियम क्रमांक ५.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे. सक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९६२ चा अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १५७ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याच्या कलम १५७ मधील पोट-कलम (१) मध्ये, खंड (इ) नंतर पुढील खंड जादा समाविष्ट करण्यात येईल :–

" (इ-अ) आरोग्यविषयक व इतर सुविधा पुरविण्यासाठी एक कोटीच्या वर भांडवल असलेल्या उद्योगाकडून वार्षिक फी."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५) याच्या कलम १५७ अन्वये जिल्हा परिषदेस कर तसेच फी लादण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सद्यःस्थितीत ग्रामीण भागात मोठ-मोठे उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर उभारले जात असल्याने तेथील जवळपासच्या परिसरात वायू, जल व ध्वनीप्रदूषण मोठ्या प्रमाणावर होते. परिणामी तेथील वस्तीत राहणाऱ्या नागरिकांना छाती, घसा व डोळ्याचे विकार संभवतात व त्यांच्या आरोग्यास नाहक धोका निर्माण होतो. शिवाय, त्यांना औषधोपचारावर बराच खर्च करावा लागतो. शासनाकडून त्या भागात उपलब्ध असलेल्या आरोग्यविषयक सुविधा निधीअभावी अपुऱ्या पडतात. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील नागरिकांना पुरेशा आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषदेकडे आवश्यक निधी उपलब्ध व्हावा यादृष्टीने एक कोटीच्या वर भांडवल असलेल्या उद्योगांकडून जिल्हा परिषदेने एक रकमी वार्षिक फी घेण्याची तरतूद प्रस्तुत अधिनियमात करणे आवश्यक झाले आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.